सत्र खटला क्रमांक ३१/२०१४
सरकार -वि- अरविंद
निशाणी १६

सरकारतर्फे साक्षिदार **क्र. १** यांची जबानी.

मी शपथेवर खरे सांगतो की,

माझे नांव – जयपालसिंग योगीराज ठाकुर

वय– ५६ वर्ष, व्यवसाय – पोलीस उपनिरीक्षक

रा. शेगांव ता. शेगांव जि. बुलडाणा

**<u>सरतपासणी–सरकारी वकील श्री अनोकार यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. सन २०१३ मध्ये हेड कॉन्टेबल म्हणून लाखणवाडा बीट हिवरखेड पोलीस ठाण्यात कार्यरत होतो. दिनांक ०४/३/२०१३ रोजी ठाणेदार इंगळे यांनी मला कळविले की शिवदास समाधान पाचपोर हे जळल्याने अकोला येथील सरकारी दवाखान्यात भरती आहेत म्हणून त्यांचा जबाब घेण्यास सांगितले. मी अकोला येथील दवाखान्यात गेलो आणि त्याचा जबाब नोंदविला त्यावर डॉ. च्या सहया घेतल्या. त्यावेळी शिवदासने सांगितले की तो लाखणवाडा येथे लग्नात त्यादिवशी होता, संध्याकाळी घरी गेला. तो पंलगावर त्याचे घरी झोपला असता त्याचे मोठे बाबा प्रल्हाद पाचपोर ९ वाजता त्याचे घरी आले. त्यांनी शिवदासला सांगितले की आरोपी अरविंद हा पेट्रोलची कॅन घेवून त्याचे घरी गेला व तो दांगडो करीत आहे. म्हणून शिवदास आरोपीच्या घरी गेला व त्याला समजावून सांगु लागला त्यावेळी आरोपीने त्याच्या हातातील पेट्रोलची कॅन शिवदासच्या अंगावर ओतली व माचीसची काडी पेटवून त्याच्या अंगावर फेकली. शिवदास जळत असल्याने बाहेर पळाला. निवृत्ती पांढरे, संजय पाचपोर, अरुण पाचपोर, कुंभार यांनी मिळुन त्याला विझवले. त्याला खामगांवला व नंतर अकोला येथील सरकारी दवाखान्यात नेले. मी त्याचा जबाब नोंदविला. त्याचा हात जळाला असल्याने त्याच्या पायाचा अंगठा घेतला. मला आता मला दाखविलेला जबाबावर माझी सही आहे. तसेच शिवदासच्या पायाचा अंगठा निशाणी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.१७</u>** देण्यात येतो. जबाब नोंदवून झाल्यावर मी पोलीस ठाण्यात आलो, ठाणेदाराला जबाब दाखविला व जबाबाच्या आधारे गुन्हा नोंदविला. तो एफआयआर मला दाखविलेला तोच आहे. त्यावर माझी फिर्यादी म्हणून माझी सही आहे. स्टेशन डायरी अंमलदार वसंतराव

देशमुख यांची सही आहे.  त्यातील मजकुर बरोबर आहे.  तो **नि.क्र. १८** वर आहे. त्यानंतर आरोपीच्या घरी जावून दिनांक १५/२/२०१३ रोजी घटनास्थळ पंचनामा केला. त्यावेळी माझे सोबत दोन पंच होते.  घटनास्थळ निवृत्ती पांढरेने दाखविले. पुर्व दिशेला घराचे तोंड होते. निवृत्ती पांढरे व पंचासोबत आम्ही घरात गेलो. तेथे खोलीत सामान अस्तव्यस्त पडले होते तेथे एक पेट्रोलची कॅन व आगपेटी पडलेली होती. त्याचा पंचनामा केला त्यावर पंचाच्या सहया घेतल्या. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखविला त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. घटनास्थळा वरील साहीत्य पाहील्यास मी ओळखु शकतो. मला आता दाखविण्यात आलेली कॅन मी ओळखतो ती मी त्यावेळी जप्त केली होती.  तसेच तेथे त्यावेळी माचीसही जप्त करण्यात आली होती. मी तपासा दरम्यान आरोपीच्या अंगावरील कपडे जप्त केले होते (आरोपीतर्फे वकीलांनी सरकारी वकील हे साक्षीदाराला दस्तऐवज दाखवून पुरावा नोंदवित असल्याबाबत आक्षेप घेतला) मला आता दाखविण्यात आलेले सिलबंद कागदात गुंडाळलेले कपडे काढण्यात आले.  साक्षीदार सांगतो की तो आरोपीचा पॅट आहे.  त्यास **वस्तु निशाणी 'अ'** देण्यात आला. पेट्रोलची कॅन **वस्तु निशाणी 'ब'** देण्यात आला. माचीसची डबी **वस्तु निशाणी 'क'** देण्यात आला. तसेच सिलबंद कागदात गुंडाळलेले कपडे दाखविले ते शिवदासचा पॅट असल्याचे सांक्षीदार सांगतो.  त्यास **वस्तु निशाणी 'ड'** देण्यात आला. तो पॅट मी दवाखान्यातुन जप्त करून आणला. जप्त मुददेमाल हेड मोहररकडे जप्त करण्यात आला.  त्याबददलच्या पावत्या मला दाखविल्या त्यावर माझ्या सहया आहेत.  त्या पावत्या **नि.१९ व २०** प्रमाणे आहेत.

सरतपास संपला.

**आरोपीच्या वकीलांनी दाखल केलेला अर्ज नि.२१ नुसार उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्विकृत

Sd/-

(श्रीमती पी. एस. काळे)

दिनांक ११.०१.२०२२ अतिरीक्त सत्र न्यायाधीश, खामगांव